(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ : नागपूर**

**रिट याचिका क्रमांक ९४/२०२१**

**याचिकाकर्ते:-**

१. वसीम फरहत खलील फरहत, वय ४६ वर्ष,
व्यवसाय: नौकरी, राहणार : कशकशन कॉलनी,
अमरावती, जि.अमरावती.

२. कृष्ण लक्ष्मणराव चिचमलकर, वय ४२ वर्षे,
व्यवसाय: नौकरी, राहणार: अर्जुन नगर,
अमरावती, तालुका आणि जिल्हा अमरावती.

३. मोहम्मद निसार मोहम्मद खलील, वय ४७ वर्ष,
व्यवसाय: नौकरी, राहणार: मोमिनपुरा, दर्यापूर,
जिल्हा अमरावती.

४. विनोद बलिरामसा बिजवे, वय ४३ वर्षे,
व्यवसाय: नौकरी, राहणार: मेहेर नगर, दर्यापूर,
जिल्हा अमरावती.

५. डॉ. विलास पांडुरंग बंसोड, वय ४१ वर्षे,
व्यवसाय:नौकरी, राहणार:नंदनवन नगर, परतवाडा,
जिल्हा अमरावती.

६. चंदा संजयराव कडू, वय ५३ वर्षे,

व्यवसाय: नौकरी, राहणार:राधेकृष्ण कॉलनी,
मोर्शी, जिल्हा अमरावती.

७. भगवंत बाबूरावजी गजभिये, वय ४५ वर्ष,
व्यवसाय: --- रहिवासी: मुलताई रोड, वरुड,
जिल्हा अमरावती.

---- विरुद्ध ----

**उत्तरवादी :**

१. महाराष्ट्र राज्य, मार्फत
सचिव, ग्रामीण विकास आणि जल संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ३२

२. महाराष्ट्र राज्य, मार्फत
सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

३. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग,
अमरावती, ता.आणि जिल्हा अमरावती.

४. जिल्हा परिषद, अमरावती मार्फत
मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती
ता. आणि जिल्हा अमरावती.

५. शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
अमरावती, तालुका आणि जिल्हा अमरावती.

-------------------------------------------------------------------------------------

श्री. ए. आर. देशपांडे, याचिकाकर्त्यांचे वकील

श्रीमती. एस. एस. जाचक, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या सहायक सरकारी वकील,

श्री. एस. एम. भांगडे, उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ चे वकील

-------------------------------------------------------------------------------------

आणि

**रिट याचिका क्रमांक ४८७/२०२०**

**याचिकाकर्तेः-** १. अरुणकुमार यादोराव बघेले, वय ४८ वर्षे,
व्यवसाय:नौकरी, राहणार:श्रीराम नगर, तुमसर,
पोस्टः तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा.

२. विजयकुमार भादू चचेरे, वय ४२ वर्षे,
व्यवसाय: नौकरी, राहणार: c/o के. ए. भोयर,
गोवर्धन नगर, तुमसर, ता. तुमसर, जि.भंडारा.

३. मंजुषा धोमन बोडेले, वय ३८ वर्षे,
व्यवसाय: नौकरी, राहणार: प्लॉट क्र.११, देव्हाडी
रोड, गोवर्धन नगर, गणेश लॉन च्या मागे, तुमसर,
ता.तुमसर, जि.भंडारा.

**-- विरुद्ध ---**

**उत्तरवादी :** १. महाराष्ट्र राज्य, मार्फत
सचिव, ग्रामीण विकास आणि जल संरक्षण विभाग,

मंत्रालय, मुंबई- ३२

२. महाराष्ट्र राज्य, मार्फत,
सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

३. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,
नागपूर, ता.आणि जिल्हा नागपूर.

४. जिल्हा परिषद भंडारा मार्फत,
मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा
ता. आणि जिल्हा भंडारा.

५. शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
भंडारा, तालुका आणि जिल्हा भंडारा.

---

श्री. ए. आर . देशपांडे, याचिकाकर्त्यांचे वकील
श्रीमती.एस. एस. जाचक, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या सहायक सरकारी वकील,
श्री. रत्नाकर खोब्रागडे, उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ चे वकील

---

**न्यायमंच : न्या. श्री. ए. एस. चांदुरकर आणि**
**न्या. श्रीमती. वृषाली व्ही. जोशी**
**तारीख: दि. २४/०१/२०२३**

**सामायिक न्यायनिर्णय :** (द्वारे न्या.श्रीमती वृषाली व्ही. जोशी)

(१) रिट याचिका क्रमांक ९४/२०२१ मधील श्री.ए.आर.देशपांडे, याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील, श्रीमती.एस.एस.जाचक, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या विद्वान सहायक सरकारी वकील, श्री. एस.एम. भांगडे, उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ चे विद्वान वकील आणि रिट याचिका क्रमांक ४८७/२०२१ मधील याचिकाकर्त्यांचे वकील ए. आर. देशपांडे, श्रीमती. एस. एस. जाचक, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ च्या सहायक सरकारी वकील, आणि श्री.रत्नाकर खोब्रागडे, उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ चे वकील, ह्यांचे म्हणणे ऐकले .

(२) अधिनिर्णय - अधिनिर्णय जरी करून त्यावर तात्काळ उत्तर मागविण्यात आले. संबंधित पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने अंतिम सुनावणी झाली. या रिट याचिकांमध्ये सारखीच आव्हाने उद्भवत असल्याने त्यांचा निर्णय या सामायिक न्यायनिर्णयाद्वारे एकत्रितपणे दिलेला आहे.

(३) रिट याचिका क्रमांक ९४/२०२१ मधील याचिकाकर्ते जिल्हा परिषद, अमरावती द्वारा चालविल्या जाणाऱ्या विविध शाळांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. रिट याचिका क्रमांक ४८७/२०२१ मधील याचिकाकर्ते भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. १२.१२.२००० रोजीच्या उत्तरवादी क्रमांक १ द्वारे जारी परिपत्रका मध्ये शिक्षकांना जिल्हा पुरस्काराने सन्मानित करण्याची योजना तयार करण्यात आली. जिल्हा स्तरीय समिती ही निवड करणार होती आणि खंड १२ मध्ये नमूद केल्यानुसार विभागीय आयुक्तांच्या संमतीने दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी पुरस्कार दिले जाणार होते. परिणामी, पुरस्कार विजेत्या शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढ मिळत होती.

०४.०९.२०१८ रोजी, उत्तरवादी क्र. १ ने आणखी एक परिपत्रक जारी केले आणि आधीच्या १२.१२.२००० रोजीच्या परिपत्रकातील खंड १२ वगळण्याचा निर्णय घेतला. परिणामी हा पुरस्कार प्रदान करणे थांबविण्यात आले. प्रत्येक याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की त्याची निवड जिल्हा स्तरावरील समितीने ०४.०९.२०१८ परिपत्रक जारी करण्यापूर्वी केली होती. परंतु ०४.०९.२०१८ नंतर त्यांना मान्यता प्रमाणपत्र देण्यात आले.

याचिकाकर्त्यांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ मिळत नसल्यामुळे त्यांनी उत्तरवादी क्र. १ ने ०४.०९.२०१८ रोजी जरी केलेले परिपत्रकाला, ज्यामधे जिल्हा पुरस्कार विजेत्या शिक्षकांना दिलेले अतिरिक्त वेतनवाढ देणे मागे घेतली गेलेली आहे, आव्हान दिलेले आहे. पर्यायी, याचिकाकर्त्यांनी अशी घोषणा करण्याची मागणी केली आहे की ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकामुळे त्यांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ नाकारता येणार नाही कारण त्यांची निवड ०४.०९.२०१८ पूर्वी करण्यात आली आहे. अशा प्रकारे याचिकाकर्ते १२.१२.२००० च्या परिपत्रकानुसार व्याजासह अतिरिक्त वेतनवाढीची मागणी करतात.

(४) याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील असा युक्तिवाद करतात की १२.१२.२००० च्या परिपत्रकातील खंड १२ मध्ये असे नमूद केले आहे की पुरस्कारासाठी निवड झाल्यानंतर शिक्षकाला जी अतिरिक्त वेतनवाढ दिली जाईल, ती वार्षिक वेतनवाढी पेक्षा स्वतंत्र असेल. दिनांक ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकाद्वारे, १२.१२.२००० च्या परिपत्रकातील, खंड १२, जे जिल्हा पुरस्कार विजेत्या शिक्षकांना एक अतिरिक्त वेतनवाढ देण्याशी संबंधित होते, ते वगळण्यात आले आहे. जिल्हा स्तरीय समितीने याचिकाकर्त्यांची निवड करून शिक्षक दिनानिमित्त जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षक म्हणून त्यांना सन्मानित केले आणि त्यानुसार त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. जिल्हा परिषदेने ०४.०९.२०१८ रोजी जारी केलेल्या परिपत्रकापूर्वी जिल्हा पुरस्कारप्राप्त शिक्षक म्हणून याचिकाकर्त्यांची निवड करण्याची प्रक्रिया पूर्ण केली होती आणि म्हणूनच याचिकाकर्त्यांची नावे मान्यतेसाठी विभागीय आयुक्तांना कळवण्यात आली. जिल्हा पुरस्कारप्राप्त शिक्षक म्हणून याचिकाकर्त्यांची निवड करण्याची संपूर्ण प्रक्रिया ०४.०९.२०१८ चे परिपत्रक जारी होण्यापूर्वी पूर्ण झाली असल्यामुळे, ह्या परिपत्रकाची अंमलबजावणी भविष्यलक्षी असेल आणि त्याला पूर्वलक्षी प्रभाव दिला जाऊ शकणार नाही. म्हणून, १२.१२.२००० च्या परिपत्रकातील खंड १२ वगळण्यात आल्यामुळे याचिकाकर्त्यांच्या अतिरिक्त वेतनवाढ मिळण्याच्या पात्रतेवर कोणताही परिणाम होणार नाही. ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकाचा कोणताही पूर्वलक्षी परिणाम असणार नाही हा मुद्दा उचलून धरण्यासाठी याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील ह्यांनी ह्या न्यायालयाने १४.०२.२०१९ रोजी *रिट याचिका क्र.* ५४१९/२०१८ (*संजय रामकृष्ण*

*वाघमारे आणि इतर - वि - महाराष्ट्र राज्य आणि इतर*) मधील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्त अमरावती ह्यांना ३/९/२०२० रोजी पाठवलेल्या पत्रात पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या (याचिकर्त्यांच्या) नावांची यादी झळकलेली आहे. यामध्ये १२.१२.२००० च्या परिपत्रकाचा विशेष उल्लेख केलेला आहे. त्यामुळे ०४.०९.२०१८ रोजी जारी करण्यात आलेले परिपत्रक बेकायदेशीर, मनमानी आणि भेदभावपूर्ण असल्याचे जाहीर करण्यात यावे आणि याचिकाकर्त्यांना या लाभांची थकबाकी व्याजासह देण्याचे निर्देश प्रतिवादींना देण्यात यावेत. रिट याचिका क्रमांक ९४/२०२१ मधील उत्तरवादी क्र.५ चा दिनांक २३.२०.१९ चा पत्रव्यवहार देखील रदद ठरवण्याची याचना करण्यात आली आहे.

(५) जिल्हा परिषदेची बाजू मांडणारे विद्वान वकील तसेच विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी रिट याचिकांना विरोध केला आहे. जिल्हा परिषद केवळ पुरस्कार प्राप्त करण्यासाठी पात्र शिक्षकांच्या नावांची शिफारस करते असे निवेदन केले गेले आहे. जी समिती प्रस्थापित करण्यात आली आहे त्या समितीद्वारे हे केले जाते. विभागीय आयुक्तांनी नावे मंजूर केल्यानंतरच निवड नक्की होते. दोन्ही याचिकांवरील विभागीय आयुक्तांची मान्यता ०४/०९/२०१८ नंतरची आहे आणि त्यामुळे नावांची मान्यता होईपर्यंत शिक्षकांची निवड नक्की होत नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांना प्रार्थनेनुसार दिलासा मिळण्याचा अधिकार नव्हता. जिल्हा परिषदेची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांनी त्यांच्या दाव्याला पुष्टी देण्यासाठी **(२००९) १ एस एस सी १८० मधील सेठी ऑटो सर्व्हिस स्टेशन आणि अन्य १ - विरुद्ध - दिल्ली विकास प्राधिकरण आणि इतर** ह्या प्रकरणामध्ये दीलेल्या निर्णयाचा आधार घेतला आहे.

(६) रेकॉर्डवरील तथ्ये सूचित करतात की जिल्हा परिषद अमरावती येथे कार्यरत याचिकाकर्त्यांचा जो संबंध आहे, त्यांच्यापैकी निवड समितीने २७.८.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हा पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या शिक्षकांच्या नावांची शिफारस केली. ०३.०९.२०१८ रोजी अशा शिक्षकांचा सत्कार विभागीय आयुक्तांच्या परवानगीने

०५.०९.२०१८ रोजी करण्याचे निर्देश दिले. विभागीय आयुक्तांची मान्यता दिनांक ०५.१०.२०१८ रोजीची आहे.

जिल्हा परिषद भंडारा संदर्भात २४.०८.२०१८ रोजी निवड समितीची बैठक झाली आणि पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या शिक्षकांच्या नावांची शिफारस करण्यात आली. या पुरस्काराच्या खर्चास विभागीय आयुक्तांनी ३१.०८.२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. पुरस्कार विजेत्या शिक्षकांचा सत्कार आणि प्रमाणपत्र वितरण ०५.०९.२०१८ रोजी करण्यात आले. त्यामुळे हे स्पष्ट होते की दोन्ही रिट याचिकांमध्ये दिनांक १२.१२.२००० च्या परिपत्रकातील खंड १२ नुसार पुरस्कार प्राप्त करण्यासाठी याचिकाकर्त्यांची निवड व शिफारस दिनांक ०४.०९.२०१८ पूर्वीची असून विभागीय आयुक्तांची मान्यता दिनांक ०४.०९.२०१८ नंतर असल्याने प्रमाणपत्रांचे प्रत्यक्ष वितरण दिनांक ०४.०९.२०१८ नंतर आहे. या वस्तुस्थितीत याचिकाकर्त्यांच्या हक्काचा विचार केला पाहिजे.

(७) १२.१२.२००० च्या परिपत्रकाचे अवलोकन केल्यास सूचित होते की पुरस्कार प्राप्त करण्यासाठी पात्र शिक्षकांची प्राथमिक निवड जिल्हा परिषदेच्या स्तरावर स्थापन केलेल्या समितीद्वारे केली जाते. पात्र शिक्षकांच्या नावांची शिफारस, आठ सदस्यीय समितीकडून विभागीय आयुक्तांकडे केली जाते आणि त्यांच्या मान्यतेने हा पुरस्कार दिला जातो. प्रत्येक वर्षीच्या सप्टेंबर महिनाच्या ५ तारखेला म्हणजेच शिक्षक दिनी हा पुरस्कार दिला जातो ही वस्तुस्थिती पण संबद्ध तथ्य आहे. जर ५ सप्टेंबरला हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी पात्र शिक्षकांची निवड, समितीने करायची असेल, तर निवड करण्याची ही प्रक्रिया त्या तारखेच्या खूप अगोदर करणे आवश्यक आहे, हे न सांगता सुद्धा समजण्या सारखे आहे. काही वर्षांपासून हा पुरस्कार ५ सप्टेंबरला किंवा त्यानंतरही देण्यात आलेला आहे. दिनांक ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकाद्वारे १२.१२.२००० च्या परिपत्रकातील खंड १२ वगळण्यात आला आहे. ह्याचा उद्देश स्पष्ट आहे की ०४.०९.२०१८ आणि त्यानंतर अशा पुरस्कारासाठी पात्र शिक्षकांची निवड करणे समिती बंद करेल. याचा अर्थ असा नाही की दिनांक ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकानुसार असा पुरस्कार प्राप्त करण्यासाठी निवडल्या गेलेल्या शिक्षकांना हा पुरस्कार मिळणार नाही. अशा दृष्टीकोनामुळे या परिपत्रकाची

पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी होईल. हा परिपत्रकाचा हेतू दिसत नाही आणि २५.०१.२०१९ रोजी औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका क्रमांक १९५४/२०१८ मध्ये दिलेल्या निर्णयात हे मानण्यात आले आहे.

मुद्दा मांडताना असा भर देण्यात आला की विभागीय आयुक्तांनी ०४.०९.२०१८ नंतर मान्यता दिल्यामुळे संबंधित शिक्षकांना १२.१२.२००० च्या परिपत्रकातील खंड १२ चा लाभ मिळणार नाही. हे लक्षात घेतले पाहिजे की, पुरस्कार मिळण्यास पात्र होण्यासाठी पात्र शिक्षकांची निवड ही महत्त्वाची पायरी आहे. समितीने एखाद्या शिक्षकाची निवड केल्याशिवाय विभागीय आयुक्तांकडून त्याच्या नावाचा विचार केला जाऊ शकत नाही. जिल्हा परिषद स्तरावर समितीने शिफारस केलेल्या नावाला विभागीय आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर अशी मान्यता, समितीद्वारे अशा शिक्षकाची निवड झाल्याच्या तारखेशी संबंधित असेल. जर एखाद्या शिक्षकाची निवड ०४.०९.२०१८ पूर्वी झाली असेल आणि विभागीय आयुक्तांनी त्याच्या नावाला ०४.०९.२०१८ नंतर मान्यता दिली असेल, तर, केवळ ह्या कारणामुळे शिक्षकांना हा पुरस्कार नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. **सेठी ऑटो सर्व्हिस स्टेशन आणि अन्य १ - विरुद्ध - दिल्ली विकास प्राधिकरण आणि इतर** (वर उल्लेखित) ह्या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयाचा जो आधार घेतला आहे तो स्पष्टपणे अनाठायी आहे कारण दावा टिकण्यासाठी वैध अपेक्षेवर भर देऊन फायलीं मधील नोंदींवर विश्वास ठेवण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत विभागीय आयुक्तांनी पुरस्कारासाठी निवडलेल्या शिक्षकाच्या नावाला मान्यता दिली नाही तर अशा शिक्षकाच्या नावाची समितीने शिफारस केली असली तरी पुरस्कार मिळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु ज्या शिक्षकाच्या नावाची शिफारस समितीने ०४.०९.२०१८ पूर्वी केली असेल त्याला केवळ विभागीय आयुक्तांनी ०४.०९.२०१८ नंतर या नावाला मान्यता दिल्यामुळे या पुरस्कारापासून वंचित ठेवता येणार नाही.

(८) शासन निर्णयाद्वारे, जरी १२.१२.२०००च्या शासकीय परिपत्रकातील खंड १२ वगळण्यात आला असला तरीही ०४.०९.२०१८ पासून ही वगळणुक लागू होईल आणि पात्र जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या नियमित वेतनवाढी संदर्भातील हक्कांव्यतिरिक्त अतिरिक्त वेतनवाढ देण्याच्या दाव्यावर विपरीत परिणाम होणार नाही. हे परिपत्रक

०४.०९.२०१८ रोजी जारी करण्यात आले आणि २८.११.२०१८ रोजी प्रमाणपत्रे देण्यात आली आणि पुरस्कार विजेत्यांची नावे दिनांक ०४.०९.२०१८ पूर्वीच्या अतिरिक्त वेतनवाढीची मान्यता प्राप्त करण्यासाठी पाठविण्यात आली. केवळ जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षक म्हणून शिक्षकांची निवड करण्यासाठी २८.११.२०१८ रोजी म्हणजेच ०४.०९.२०१८ नंतर मान्यता देण्यात आल्यामुळे याचिकाकर्त्यांना एक अतिरिक्त वेतनवाढ  मिळण्यापासून ठेवू शकत नाही आणि वंचित ठेवता येणार नाही. विभागीय आयुक्तांकडून याचिकाकर्त्यांच्या निवडीला उशिरा मान्यता मिळणे हे अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ नाकारण्याचे कारण असू शकत नाही. जिल्हा पुरस्कारप्राप्त शिक्षक म्हणून याचिकाकर्त्यांची निवड ०४.०९.२०१८ रोजी चे परिपत्रक जारी करण्यापूर्वी करण्यात आली आहे. वस्तुस्थिती दर्शवते की हा पुरस्कार आहे जो त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे आणि तो नियमित वेतनवाढी व्यतिरिक्त आहे. २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयात शिक्षकांना पुरस्कार म्हणून देण्यात येणाऱ्या कोणत्याही प्रोत्साहनाबद्दल काहीही सांगण्यात आलेले नाही. त्यामुळे आम्ही विद्वान सहाय्यक सरकारी वकील आणि संबंधित जिल्हा परिषदांचे विद्वान वकील ह्यांची सादरीकरणे स्वीकारण्याच्या स्थितीत नाही. अतिरिक्त वेतन वाढी जारी ठेवायला हव्या होत्या आणि त्याचा लाभ जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत मिळायला हवा होता. त्यामुळे या सर्व याचिकाकर्त्यांना दिनांक १२.१२.२००० च्या शासन परिपत्रकानुसार अग्रीम वेतनवाढीचा लाभ मिळावा व ते त्यास पात्र आहेत, असे आमचे मत आहे.

(९) वरील दृष्टीकोनातून, आम्ही रिट याचिकांना मंजुरी देत आहोत. १२.१२.२००० च्या शासकीय परिपत्रकातील खंड १२ अन्वये शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देऊनत्यांना पुरस्कृत करण्याचे निर्देश आम्ही संबंधित जिल्हा परिषदांना देत आहोत. इथे असे नमूद करण्यात येते की ०४.०९.२०१८ च्या परिपत्रकामुळे याचिकाकर्त्यांच्या एक अतिरिक्त वेतनवाढ मिळण्याच्या दाव्यावर कोणताही परिणाम होणार नाही, कारण त्यांची निवड/शिफारस ०४.०९.२०१८ पूर्वी करण्यात आलेली आहे. त्यानुसार आजपासून तीन महिन्यांच्या कालावधीत लाभ जारी करण्यात यावे.

(१०) वरील परिस्थितीत खर्चाबाबत कोणताही आदेश न देता अधिनिर्णय कायम करण्यात येतो.

(न्या.श्रीमती.वृषाली. व्ही. जोशी) (न्या.श्री.ए.एस.चांदुरकर)



## <u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल".